महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च 2020

4. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे दिलेल्या निर्देशानुसार

5. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/577/2021, दिनांक 22 फेब्रुवारी, 2021

6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/5 92/2021, दिनांक 06 मार्च, 2021

7. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/601/2021, दिनांक 09 मार्च, 2021

---

क्र दंडप्र-01/कावि/2021/603 दिनांक 11 मार्च, 2021

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात व देशांतर्गत कोविड-19 विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तींची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 16/02/2021 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे निर्देश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, जळगांव जिल्हयात कोविड-19 विषाणूमुळे रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणू संसर्गात अधिक वाढ होऊ न देता उपाययोजना राबवणे आवश्यक आहे याकरीता जळगांव जिल्हयातील चोपडा, चाळीसगांव व अमळनेर इत्यादी नगरपालिकांच्या हद्दीत निर्बंध लागू करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, **मी. अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 व आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयातील **चोपडा व चाळीसगांव या नगरपालिका हद्दीत दिनांक 13 मार्च, 2021 रोजी रात्री 00.01 वाजेपासून दिनांक 14 मार्च, 2021 रोजी रात्री 24.00 वाजे पावेतो** खालील प्रमाणे निर्बध लागू करण्यात येत आहे.

1) **सर्व बाजारपेठा, आठवडी बाजार बंद राहतील.**

2) **किराणा दुकाने, Non-Essential इतर सर्व दुकाने बंद राहतील.**

3) **किरकोळ भाजीपाला / फळे खरेदी-विक्री केंद्रे बंद राहतील.**

4) **शैक्षणिक संस्था/शाळा/महाविद्यालय, खाजगी कार्यालये बंद राहतील.**

5) **हॉटेल / रेस्टॉरंट (होम डिलीव्हरी, पार्सल वगळता) बंद राहतील.**

6) **सभा/ मेळावे/बैठका / धार्मिक स्थळे, सांस्कृतिक/धार्मिक व तत्सम कार्यक्रम बंद राहतील.**

7) **शॉपींग मॉल्स / मार्केट, बार्बर शॉप, स्पा, सलून, लिकर शॉप बंद राहतील.**

8) **गार्डन, पार्क, बगीचे सिनेमागृहे, नाट्यगृहे, व्यायामशाळा, जलतरण तलाव प्रेक्षकगृहे, क्रिडा स्पर्धा, प्रदर्शने, मेळावे, संमेलने बंद राहतील.**

9) **पानटपरी, हातगाडया, उघडयावर खाद्यपदार्थ विक्रीची ठिकाणे बंद राहतील.**

वरील प्रमाणे लागू करण्यात आलेल्या निर्बंधातून **"दुध विक्री केंद्रे, वैद्यकीय उपचार व सेवा, मेडीकल स्टोअर्स, ॲम्ब्युलन्स सेवा, आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित घटक"** यांना सुट देण्यात येत आहे. तसेच दिनांक 13 मार्च, 2021 व दिनांक 14 मार्च, 2021 रोजी पूर्व नियोजित परिक्षा असल्यास सदर कालावधीत परिक्षार्थी व परिक्षेकरीता नेमण्यात आलेल्या अधिकारी /कर्मचारी यांना वर नमूद केलेल्या निर्बधातून सुट राहील.

**वरील प्रमाणे चोपडा व चाळीसगांव या नगरपालिका हद्दीत लागू करण्यात आलेल्या निर्बंधांचे पालन होत आहे किंवा नाही याची जबाबदारी** संयुक्तिकरीत्या **पोलीस विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांची राहील.**

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता,** 1860 (45) **चे कलम** 188, **आपत्ती व्यवस्थापन कायदा** 2005 **मधील कलम** 51 **ते** 60 **व फौजदारी प्रक्रिया संहिता,** 1973 **चे तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक /03/2021 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगांव**

प्रत :- **माहितीसाठी व आवश्यक त्या** कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
4. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
7. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
8. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. सहायक संचालक,अन्न व प्रशासन ,जळगांव
11. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.